दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ११२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२२ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## प्रफुल पटेल यांच्यावर ईडीची धडक कारवाई



**दै.रायगड नगरी । मुंबई**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल पटेल यांची काही दिवसांपूर्वी चौकशी केली होती. आज ईडीने त्यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. त्यांचं वरळीतील घर जप्त करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. वरळीतील सीजे हाऊसमधील चार मजले जप्त करण्यात आले आहेत.

इक्बाल मिर्ची प्रकरणात ईडीने कारवाई केली आहे. प्रफुल पटेल यांची २०१९ मध्ये चौकशीही झाली होती. इक्बाल मिर्ची प्रकरणी हे आरोप होते. त्यानंतर प्रफुल पटेल यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती आणि त्यानंतर आपलं म्हणणं मांडलं होतं. आता याच प्रकरणात ईडीने चार मजले म्हणजेच प्रफुल पटेल यांचं घर जप्त केलं आहे.



# द्रौपदी मुर्मू देशाच्या नव्या राष्ट्रपती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून या देशाच्या नव्या राष्ट्रपती झाल्या आहेत. त्यांनी यूपीएचे उमेदवार यशवंत सिन्हा यांचा पराभव केला आहे. आज राष्ट्रपतिपदासाठीच्या निवडणुकीची मतमोजणी पार पडली. त्यामध्ये द्रौपदी मुर्मू या मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाल्या आहेत. त्या देशातील पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती ठरल्या आहेत. त्या देशाच्या १५ व्या राष्ट्रपती ठरल्या आहेत.

राष्ट्रपतिपदासाठी १८ जुलै रोजी झालेल्या निवडणुकीची आज मतमोजणी झाली. या निवडणुकीत द्रौपदी मुर्मू आणि यशवंत सिन्हा यांच्यात लढत होती. द्रौपदी मुर्मू आणि यशवंत सिन्हा यांचा पराभव केला आहे. या निवडणुकीत ७१९ खासदारांसह देशभरातील ४ हजारांहून अधिक आमदारांनी मतदान केले होते. तर राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे येत्या २४ जुलै रोजी निवृत्त होणार आहेत.

मुर्मू यांच्या विजयानंतर भाजप देशभर जल्लोष साजरा करण्यात येत आहे. दिल्लीत विजय रॅली काढली जाणार आहे. राष्ट्रपतीपदाचा उमेदवार विजयी झाल्यानंतर रॅली काढण्याची ही पहिलीच वेळ असेल. दिल्लीतील रॅलीचं नेतृत्व भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा करणार असून यावेळी ते भाषणही करणार आहेत. यावेळी तब्बल २० हजार लाडूंचं वाटप केलं जाणार आहेत.

# यंदा दहीहंडी, गणेशोत्सव धुमधडाक्यात

## निर्बंधमुक्त केल्याची मुख्यमंत्र्यांची दिलासादायक घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**गेल्या दोन वर्षांमध्ये कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दहीहंडी, गणेशोत्सव असे मुंबई आणि महाराष्ट्रातील लोकप्रिय उत्सव साजरे करण्यावर मर्यादा आली होती. कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी या उत्सवांवर अनेक निर्बंध लागू करण्यात आले होते. मात्र आता कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्याने यावर्षी राज्यात दहीहंडी, गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा होणार आहे. राज्य सरकारने दहीहंडी आणि गणेशोत्सव निर्बंधमुक्त साजरे करण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत याबाबतची माहिती दिली आहे.**




गणेशोत्सव आणि दहीहंडीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज अतिशय महत्वाची बैठक झाली. गेली दोन वर्षे कोरोनामुळे सर्व सण उत्सवांवर मर्यादा होत्या. निर्बंध होते. इच्छा असूनही उत्सव साजरे करता आले नाहीत. यावर्षी मात्र सर्व मंडळांचा उत्साह आणि गेल्या दोन वर्षांतील मर्यादा पाहता यावर्षी गणेशोत्सव, दहीहंडी, नवरात्र उत्साहात साजरे झाले पाहिजेत, असा कल दिसून आला. त्यामुळे यावर्षी सर्व उत्सव निर्बंधांविना साजरे होतील. कायदा सुव्यवस्था राखून सण साजरे व्हावेत, यासाठी पोलिसांना सूचना दिल्या आहेत, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

गणेशोत्सवापूर्वी सर्व मार्गांवरील खड्डे बुजवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मंडपांच्या परवानग्या सुटसुटीत झाल्या पाहिजेत. यासाठी एक खिडकी योजना, ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुटसुटीत करण्यात आल्या आहे. गणेश मंडळांना नोंदणीसाठी शुल्क आकारण्यात येणार नाही. कोरोनामुळे उंचीवर मर्यादा घालण्यात आली होती. मात्र ही मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशी घोषणाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

# मुरुड समुद्र किनाऱ्यावर ऑईलचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड समुद्रकिनाऱ्यावर दरवर्षी सालाबादप्रमाणे नित्य नियमाने ऑइल येण्याची प्रथा सुरू आहे. दरवर्षी म्हणजे मे महिना व जुलै महिना अखेर समुद्रकिनाऱ्यावर ऑइल येण्यास सुरुवात होते. याही वर्षी जुलै महिन्यात हा ऑइल संपूर्ण समुद्र किनारी पसरून ऑइलच्या साम्राज्य निर्माण झाले आहे.

जून व जुलै महिन्यात बंदी काळ असल्याने मे महिन्यात मच्छीमार होड्या समुद्र किनारी घेऊन यांची देखभाल केली जाते. या होड्यांचे मशीन यांची देखभाल चालू असताना यातील ऑइल हे समुद्रात फेकले जाते त्यामुळे हे ऑइल पाण्यामध्ये मिसळत नसल्याने ते पुन्हा समुद्रकिनाऱ्यावर येते. आता जुलै महिना सुरू झाला असल्याने मच्छीमार बोटींची देखभालीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मे महिना मध्ये ही देखभाल होत

.../२



## संक्षिप्त...

### आरे कारशेडच्या कामावरील बंदी उठवली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ठाकरे सरकारच्या काळात स्थगिती देण्यात आलेल्या मुंबईच्या आरे परिसरातील मेट्रो कारशेडच्या कामावरील बंदी उठवण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. आरे परिसरात असलेल्या जंगलामुळे याठिकाणी मेट्रो प्रकल्पाची कारशेड उभारण्याला विरोध करण्यात आला होता. मात्र, फडणवीस सरकारच्या काळात रातोरात झाडे कापून या प्रकल्पाचे काम पुढे रेटण्यात आले होते. परंतु, ठाकरे सरकारने सूत्रे हाती घेतल्यानंतर आरेतील मेट्रोच्या कारशेडचे काम थांबवण्यात आले होते. त्याऐवजी पर्यायी जागेचा शोध सुरु झाला होता. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारने राज्याची सूत्रे हाती घेताच हा निर्णय बदलण्यात आला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी त्यावर अधिकृतरित्या शिक्कामोर्तब केले. त्यामुळे आता आरेतील मेट्रो कारशेडचे काम सुरु करण्याचा मार्ग पुन्हा एकदा मोकळा झाला आहे. सरकारने आरेतील कारशेडवरील बंदी उठवली असल्याने मुंबईकर आणि पर्यावरणवादी अधिक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

एकनाथ शिंदे यांच्या या निर्णयामुळे आता आरे परिसरातच कारशेडच्या कामाला वेगाने सुरुवात होऊ शकते. शिंदे-फडणवीस सरकारने मेट्रो प्रकल्पाची धुरा पुन्हा अश्विनी भिडे यांच्याकडे सोपवली होती. यापूर्वीच या कारशेडचे काही काम पूर्ण झाले आहे. मात्र, आता नवीन वाद निर्माण होऊन तो चिघळण्यापूर्वीच आरेतील मेट्रो कारशेडचे काम शक्य तितक्या जलद गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असेल. मात्र, आता यावर शिवसेना कितपत आक्रमक भूमिका घेऊ शकते, हे पाहावे लागले. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर आरे कारशेडचा मुद्दा चांगलाच तापण्याची शक्यता आहे.

# जेएनपीए विरोधात एक दिवसीय कामबंद आंदोलन

## ठेकेदारीतील ९५० कामगारांच्या वेतनवाढीचा करार करण्यात टाळाटाळ

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए बंदरात विविध संस्थांमध्ये ठेकेदारी पध्दतीवर काम करणाऱ्या सुमारे ९५० कामगार यांच्यातील वेतनवाढीचा करार २७ महिन्यांपूर्वीच संपुष्टात आला आहे.मात्र त्यानंतर झालेल्या चर्चा व बैठकीत वेतन वाढीचा करार करण्याचे दोन वेळा दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात दिरंगाई करणाऱ्या जेएनपीए प्रशासनाविरोधात कामगार संतप्त झाले आहेत. त्यामुळे कामगारांच्या न्याय हक्कासाठी आणि दिरंगाईचा निषेध करण्यासाठी जेएनपीटी जनरल कामगार संघटनेने जेएनपीए विरोधात २९ जुलै २०२२ रोजी एक दिवसीय काम बंद आंदोलनाची नोटीस बजावली आहे.



जेएनपीए बंदरातील अनेक कामे ठेकेदारी पध्द-तीवर स्थानिक मजूर व अन्य संस्थांच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून केली जात आहेत. विविध संस्थांच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या ठेकेदारीच्या कामात सध्या सुमारे ९५० स्थानिक काम करत आहेत. दर पाच वर्षांनी जेएनपीए व संस्था यांच्यात वेतन वाढीचा करार केला जातो. मात्र वेतनवाढीचा करार मागील २७ महिन्यांपूर्वीच ३१ मार्च २०२० रोजी संपुष्टात आला आहे. त्यामुळे पाच वर्षांसाठी वेतनवाढीचा करार करण्यात यावा अशी कामगारांची मागणी आहे.

वेतनवाढीचा करार करण्यासाठी मजुर व अन्य ठेकेदारीवर काम करणाऱ्या विविध संस्थांचे पदाधिकारी आणि जेएनपीटी जनरल कामगार संघटनेने अध्यक्ष सुरेश पाटील, कार्याध्यक्ष सुधीर घरत, जनरल सेक्रेटरी जनार्दन बंडा यांनी ठेकेदारीवर काम करणाऱ्या ९५० कामगारांच्या वेतनवाढीचा करार करण्यासाठी तीन महिन्यांपूर्वी जेएनपीए अध्यक्ष संजय सेठी यांचीही भेट घेतली होती. याप्रसंगी उरणचे आ. महेश बालदी यांच्यासह जेएनपीटी जनरल कामगार संघटनेने पदाधिकारीही उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेत वेतनवाढीचा करार करण्याचे आश्वासन जेएनपीए व्यवस्थापनाच्या वतीने देण्यात आले होते. मात्र तीन महिने उलटून गेल्यानंतरही वेतनवाढीचा करार करण्यासाठी दहा दिवसांपूर्वी पुन्हा एकदा भेट घेऊन आठवण करून देण्यात आली होती. मात्र त्यानंतरही वेतनवाढीचा करार अस्तित्वात आला नाही. त्यामुळे कामगार संतप्त झाले आहेत. वारंवार आश्वासन

.../२

# सोनिया गांधी यांच्या समर्थनार्थ पनवेल काँग्रेसकडून केंद्र सरकार विरोधात निषेध



**दै.रायगड नगरी । पनवेल**

काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांना पूर्वग्रह दुषित हेतून सक्तवसुली संचालनालय (ईडी) कार्यालयात जुन्या बंद झालेल्या प्रकरणावरून चौकशीला बोलाविले आहे व हेतूपूरस्सर त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्याचा निषेध करण्यासाठी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आर. सी. घरत यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालयात जाऊन केंद्र सरकारच्या निषेधाचे निवेदन देण्यात आले. या वेळी उपविभागीय अधिकारी मार्फत तळेकर यांनी निवेदन स्वीकारले. सदर प्रसंगी पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत, जिल्हा सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष लतीफ शेख, अल्पसंख्याक सेल उपाध्यक्ष आदम ढलाईत, सुधीर मोरे, मोरेश्वर पाटील, अनुपमा चुढा, नीता शेनोय, डॉ. अमित दवे, आरती ठाकुर, अंजुम तेरवा, इ अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलमधून कट्टर शिवसैनिकांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पाठिंबा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेला हादरा देत वेगळ्या गटाची स्थापना केली तेव्हापासून एकनाथ शिंदे यांना राज्यभरातून आणि विविध स्तरातून समर्थन मिळत आहे. पनवेल मध्येही काल मोठ्या प्रमाणावर याची सुरुवात झालेली पहावयास मिळाली. पनवेल महानगर क्षेत्राचे संघटक तथा माजी नगर-सेवक ॲडव्होकेट प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी आपल्या ४०० ते ५०० समर्थक कार्यकर्ते व काही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह एकनाथ शिंदे यांना जाहीर पाठिंबा देत यापुढे शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्याचे निश्चित केले.



पनवेल मधील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर सोमण यांनी शिवसेनेच्या माध्यमातून आज पर्यंत मोठा संघर्ष केला आहे शिवसेनेचे निष्ठावान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोमण कुटुंबीयांतील प्रथमेश सोमण यांनी शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने निश्चितच हा पनवेल शिवसेनेला एक धक्का मानला जात आहे. प्रथमेश सोमण यांनी ही तरुण वयात नगरसेवक म्हणून व त्यानंतर शहर प्रमुख व महानगर संघटक अशा विविध पदांवर अनेक सामाजिक प्रश्न हाताळले असून मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक उपक्रमांचे

.../२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : धानसर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धानसर, ता.पनवेल, जि.रायगड**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| विनायक गोविंद सांडू | १५६/४/१ | ९७८००.०० पैकी ४८९० चौ.मी. / ४८.९ गुंठे अविभक्त हिस्सा | ९७८०.०० |
| | १५६/३ | ४६३०.०० पैकी ३३१.५ चौ.मी. / ३.३१ गुंठे अविभक्त हिस्सा | ३.३७ |
| | १५६/६/१ | १७२०.०० पैकी १०० चौ.मी./१ गुंठा अविभक्त हिस्सा | १७२.०० |

तरी सदरहू वर नमूद मिळकतींबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२१/०७/२०२२

**सही/-**
**स्वप्निल अ. उपाध्ये**
**ॲडव्होकेट-पनवेल**

पत्रव्यवहाराचा पत्ता : फ्लॅट नं.१०१, अनघा अपार्टमेंट को.हौ. सो., जोशी आळी, पटेल हॉस्पिटल जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६, मोबा.नं.९०२९१६१९१४

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : अडिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : अडिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| विनायक गोविंद सांडू | १३८/अ/२ | १५१००.०० पैकी ७५५ चौ.मी. / ७.५५ गुंठे अविभक्त हिस्सा | ७.९१ |
| | १३८/अ/१ | १६४६०.०० पैकी ८२३ चौ.मी. / ८.२३ गुंठे अविभक्त हिस्सा | १३.३७ |
| | १३७ | २०४१० पैकी १०२०.५ चौ.मी. / १०.२० गुंठे अविभक्त हिस्सा | ३०.०० |

तरी सदरहू वर नमूद मिळकतींबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२१/०७/२०२२

**सही/-**
**स्वप्निल अ. उपाध्ये**
**ॲडव्होकेट-पनवेल**

पत्रव्यवहाराचा पत्ता : फ्लॅट नं.१०१, अनघा अपार्टमेंट को.हौ. सो., जोशी आळी, पटेल हॉस्पिटल जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६, मोबा.नं.९०२९१६१९१४

# नवीन पनवेलमध्ये २४ जुलैला ध्यानसाधना कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री धुतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित इन्स्टिटयूट आफ योग अँन्ड आयुर्वेद व आरोग्य सेवा समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने ध्यानसाधना कार्यशाळेचे आयोजन रविवार दि. २४ जूलै २०२२ रोजी सकाळी ७ वाजता नविन पनवेल येथील के.आ. बांठिया विद्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी नवी मुंबईचे योगशिक्षक व निसर्गोपचार तज्ञ तथा योगविद्या निकेतन मुंबईचे उपपिठाधिकारी दुर्गादास सावंत उपस्थित राहणार असून ते उपस्थितांना योगासंबंधी बहुमूल्य मार्गदर्शन करणार आहेत. सदर कार्यशाळा विनाशुल्क असून येणाऱ्या नागरिकांना मोफत प्रवेश दिला जाणार आहे, तरी तमाम नागरिकांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून सदर उपक्रम यशस्वी करावे, असे आवाहन आरोग्य सेवा समितीच्या कार्यक्रम प्रमुख गीता गुप्ता यांनी केले आहे. यावेळी आरोग्य सेवा समितीचे अध्यक्ष मधुसूदन जोशी, उपाध्यक्ष सुरेश जाधव, योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके उपस्थित होते.

# समाज जागृतीसाठी सोनगाव कुणबी ग्रुपचे एक पाऊल पुढे

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न ग्रामीण शाखा रोहा अंतर्गत सोनगाव कुणबी ग्रुपने समाजप्रबोधनासाठी एक पाऊल पुढे टाकून गावागावात समाज प्रबोधनाचे कार्य हाती घेतले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या सभेमध्ये सुनील मोहिते, धर्मा शेलार, संतोष खेरट कर, महेश तुपकर, हेमंत कडव, विनेश भोकटे, दत्ता सानप, सुशील खांडेकर, प्रकाश भोसले, कचरे आदी युवकांची कमिटी स्थापन करण्यात आली. तर समाज प्रबोधनासाठी ग्रुपमधील सर्व जेष्ठ समाजबांधव व युवक वर्गाने एकत्रितपणे कार्य करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे जेष्ठ समाजबांधव खेळू ढमाल यांनी सांगितले. तर अनिष्ट रूढी व परंपरा यामुळे समाजाचे फार नूकसान होत चालले असल्याची भावना व्यक्त करतानाच यांचा वेळीच त्याग करणे आवश्यक असल्याचे खेळू ढमाल यांनी सांगितले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जयश्री चारुहास पन्हाले, रा.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नावे ताबेकब्जात व वहिवाटीत असून सदर जमीन मिळकत त्याच्याकडून आमचे अशिल हरेश काशिनाथ माळी रा.दुंदरे, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : दुंदराई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गट/ भूमापन नं. | हिस्सा नं. | भू-धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ३१ | १ अ | -१ | ०-०५-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-०५-०० | ०.७६ |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिलांवर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

पनवेल
दिनांक : २१/०७/२०२२

**सही/-**
**ॲड.वर्षा पाटील**
**गाळा नं.०६, पनवेल-दुंदरे रोड, उसर्ली बु. स्टॉप, पो.मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड**

# महाड प्रांताधिकाऱ्यांनी दिली दरडप्रवण गावांना भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी दि.२० जुलै २०२२ रोजी पोलादपूर तालुक्यातील मौजे कातळी (कामतवाडी) आणि कोंढवी या दरडप्रवण गावांना भेट दिली.

यावेळी त्यांनी दरडप्रवण भागाची पाहणी केली आणि ग्रामस्थांना अतिवृष्टीच्या कालावधीत स्थलांतरित होण्याच्या सूचना दिल्या. तसेच दरडीची लक्षणे ओळखणे, आपत्ती येण्यापूर्वी सतर्क राहणे, रेड अलर्ट, ऑरेंज अलर्ट याबाबत देखील सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी ग्रामस्थांनी सांगितलेल्या समस्यांवर उपाययोजना कराव्यात अशा संबंधित कर्मचाऱ्यांना महाड प्रांताधिकारी श्रीमती पुदलवाड यांनी सूचना दिल्या. या पाहणी दौऱ्यावेळी पोलादपूर तहसिलदार दिप्ती देसाई, मंडळ अधिकारी, तलाठी, संपर्क अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# राजिप आपटवणे शाळेत आरोग्य विषयक जनजागृती

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

राजीप शाळा आपटवणे येथे दि प्राईड इंडिया या संस्थेने विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक जनजागृती व्हावी त्यांना आरोग्याचे महत्त्व कळावे आणि आरोग्याची गोडी लागावी या उद्देशाने हायजेनिक कीटचे नुकतेच वाटप केले. तसेच ग्रामस्थ व पालकांसाठी मजबूत आणि टिकाऊ जम्बो पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

घरात व गावात होणारा कचरा या पिशवीत टाकल्याने घर व गाव स्वच्छ राहील. आणि ग्रामस्थांना स्वच्छतेकडून समृद्धीकडे वाटचाल करता येईल हा यामागील उद्देश होता. या कार्यक्रमाला आपटवणे सरपंच शरद चोरघे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वैशाली केदारी, सदस्या नेहा भिसे, मयुरी दंत व सारिका दंत उपस्थित होत्या.

शिक्षक राजेंद्र पाटील यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तर मुख्याध्यापिका प्रमिला म्हात्रे यांनी शाळा विकासात भरीव योगदान दिल्याबद्दल दि प्राईड इंडिया संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेजर वसंत मोरे आणि संस्थेच्या उपक्रमशील शिक्षिका रजनी राऊत यांचे आभार मानले.

यावेळी सरपंच शरद चोरघे यांनी शाळेला फरशी बसवण्याचे आश्वासन दिले.

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.दिव्या द. घरत**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.८२९/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.२२/०८/२०२२

श्री.रमेश डायालाल ढकान — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका, पनवेल
निबंधक जन्म मृत्य नोंदणी प्राधिकारी — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.डायालाल हरिदास ढकान हे दि.२०/०६/२०२० रोजी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-अ कडील खारघर विभागातील मौजे : तळोजे पाचनंद, जागृती रिहॅबिलिटेशन सेंटर, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे हॉस्पिटल मध्ये झाला आहे. अर्जदार यांनी आपले वडील कै.डायालाल हरिदास ढकान, यांचे मृत्यूची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. पनवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.डायालाल हरिदास ढकान हे मयत आहे किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून एक महिन्याचे आत मे.न्यायालयात स्वतः अथवा त्यांचे वकील किंवा कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपल्या हरकती नोंदवाव्यात. या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू १ महिन्याचे मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू मे.न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू मयताचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश देण्यात येईल.

आज दि.२१/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

श्री.मुजावर सो

**वकील एन.एस.साळुंखे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.११००/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०८/२०२२

१) श्रीमती.मनिषा गुलाबराव शिंगाडे व इतर २ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.गुलाबराव दाजी शिंगाडे हे खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दि.११/१०/२०२१ रोजी मौजे : शिंगाडवाडी, पो.कातरखटाव, ता.खटाव, जि.सातारा येथे झाल्याने अर्जदार यांनी कै.गुलाबराव दाजी शिंगाडे यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

**परिशिष्ट 'अ' मिळकतीचे वर्णन**
**अपार्टमेंट नं.ए-५, ए-विंग, १:१, पहिला मजला, त्रिमुर्ती को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.४, सेक्टर-०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६. क्षेत्रफळ १८.२२० चौ.मी. बांधीव**

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.मनिषा गुलाबराव शिंगाडे, अर्जदार क्र.२ श्री.मयुर गुलाबराव शिंगाडे व अर्जदार क्र.३ श्री.विपुल गुलाबराव शिंगाडे हे कै.गुलाबराव दाजी शिंगाडे ह्यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत. तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते अर्जदार यांच्या वारसपत्रास हक्कदार आहेत हे सिद्ध झाल्यास त्यंना हे वारसपत्र मंजूर करेल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड**
**येथील खालील वर्णनाची मिळकत**

| अ.क्र. | जमीन मालकाचे नांव | गट क्रं | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १<br>२ | श्री.रघुनाथ शनवार पाटील<br>सौ.बारकूबाई एकनाथ म्हात्रे | ५५ | ६ | ०-०९-०० |

सदर मिळकत ही आमचे अशिलांनी श्री.रघुनाथ शनिवार पाटील व सौ.बारकूबाई एकनाथ म्हात्रे या जमीन मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांच्या लेखी हरकती ज्यामध्ये नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल
दि.२१/०७/२०२२

**सही/-**
**सचिन पुंडलिक केणी**
**ॲडव्होकेट, पनवेल**
**शॉप क्र.१४, प्लॉट क्र.१०७ ए, अशियाना सोसायटी, विरुपक्ष मंगल कार्यालयाजवळ, नवीन कोर्ट रोड, जुना पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : वावंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकती मुळ जमीन मालकांकडून मी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वावंजे | ज्ञानेश्वर सुदाम पाटील | १३३/२/अ/१ | ०-४०-४०<br>पो.ख.०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-४०-४० | ८.७५ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी या माझेवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २१/०७/२०२२

**सही/-**
**श्री.रामचंद्र पांडुरंग भागवत**
**मु.चिंध्रण, पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८**
**मोबा नं.९२२२४४१६२५**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुरुड समुद्र किनाऱ्यावर ऑईलचे साम्राज्य

असल्याने त्या होड्यांतील इंजिनचे ऑइल समुद्रात फेकले जात असल्याने मे व जुलैमध्ये समुद्रकिनारी ऑइल मोठ्या प्रमाणात दिसून येते.

समुद्रकिनाऱ्यावर आलेल्या ऑइल मुले सकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. व या ऑइल मुले किनाऱ्यावरील मासे उत्पादनावरील परिणाम होत असतो. त्यामुळे समुद्रकिनारा मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होत आहे. तरी या कालावधीमध्ये होड्यांच्या मशीनचा ऑईल हा साठवण करून योग्य पद्धतीने विलेवाट लावावी व होणाऱ्या संभाव्य प्रदूषण टाळावे अशी मागणी पर्यावरण प्रेमींनी केली आहे.

## जेएनपीए विरोधात एक दिवसीय कामबंद आंदोलन

देऊनही वेतनवाढीचा करार करण्यात जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर कामगारांनी निषेध नोंदवला आहे. इतक्यावरच न थांबता जेएनपीटी जनरल कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जेएनपीएचे वरिष्ठ प्रबंधक तथा सेक्रेटरी जयंत ढवळे यांची भेट घेऊन जेएनपीए विरोधात २९ जुलै २०२२ रोजी एक दिवसीय काम बंद आंदोलनाची नोटीसही बजावली आहे.

कामगारांना केंद्र सरकारच्या नियमानुसार वेतनवाढीचा करार करण्याच्या सूचना जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मात्र त्यानंतरही झारीतील शुक्राचार्य बनलेले संबंधित विभागाचे अधिकारीच वेतनवाढीचा करार करण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. अध्यक्षांपेक्षाही मोठे असल्याचा गैरसमज अधिकाऱ्यांना करून घेतला आहे. मात्र यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचा गंभीर आरोप जेएनपीए जनरल कामगार संघटनेने कार्याध्यक्ष तथा महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी केला आहे.

## पनवेलमधून कट्टर शिवसैनिकांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पाठिंबा

आयोजन केले आहे. काल झालेल्या कार्यक्रमात शिंदे यांनी प्रथमेश सोमण यांचे कौतुक केले.या कार्यक्रमाची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या अधिकृत ट्विटर हँडल द्वारे प्रसिद्ध केली. सदर कार्यक्रमात सोमण यांच्यासह विभागप्रमुख प्रसाद सोनवणे, शाखाप्रमुख अर्जुन परदेशी, अभिजीत साखरे, युवासेना शहर सचिव अभिनय सोमण, शाखाप्रमुख रमेश बेद, दर्यासागर पतपेढीचे संचालक गणेश वाघिलकर, गटप्रमुख नंदकुमार, शिवसेना प्रणित शिवप्रेरणा श्रमिक कामगार सेनेशी संलग्न सर्व पदाधिकारी - कामगार सदस्य, पाली- देवद विचुंबे येथील शिवसैनिक व शिवनगर रहिवास संघटनेचे सर्व पदाधिकारी, महिला उपजिल्हा संघटिका सीमा मानकामे, शाखाप्रमुख यतीन मानकामे, उसरली खुर्द विकास मंचचे कार्यकर्ते, कामोठे परिसरातील विभाग प्रमुख शरद निकम डॉक्टर वडगावकर ज्येष्ठ महिला पदाधिकारी सुलक्षणा जगदाळे, आशिष पनवेलकर यासह शेकडो कार्यकर्ते व शिवसैनिकांनी शिंदे गटात प्रवेश केला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले, ठाणेचे माजी महापौर नरेश म्हस्के, नविन पनवेल शहर प्रमुख रुपेश ठोंबरे आदी उपस्थित होते. पनवेल मधील जवळजवळ सर्वच उर्वरित पदाधिकाऱ्यांनी माझ्या भूमिकेचे स्वागत केले असून मला पाठिंबा दिला आहे.तसेच येणाऱ्या काळात आमच्या संपर्कात असणारे अनेक पदाधिकारी शिंदे साहेबांना समर्थन देतील असा विश्वास प्रथमेश सोमण यांनी व्यक्त केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालय येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लायन्स क्लब ऑफ श्रीबाग तसेच तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाउंडेशन अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सक्षमीकरणा अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका संचलित माध्यमिक विद्यालय येथे नुकताच स्पर्शज्ञान (गुड टच अँड बॅड टच) या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका माधुरी नारखेडे, शिक्षिका नीता लबडे, कांचन भोये, स्मिता साबळे, मनीषा जाधव, दीपिका भोईर, तसेच शिक्षिका व तेजस्विनी फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा भाग्यश्री तांडेल यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका डॉ.ड.निहा राऊत यांनी मुलींना व मुलांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श यांतील फरक विविध उदाहरणांच्या तसेच तक्त्यांच्या माध्यमातून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. अशावेळी मुला-मुलींनी घ्यावयाची दक्षता, काळजी व तत्परता याविषयी मार्गदर्शन केले. तसेच मुला मुलींकडून त्यांच्या समस्या व प्रश्न जाणून घेवून त्यांचे निरसन केले. तेजस्विनी फाउंडेशनच्या सहसचिव राखी पाटील यांनी मुलांना स्पर्श कसा ओळखावा याविषयी मार्गदर्शन केले तर आजकाल सायबरच्या माध्यमातून गुन्ह्यांचे प्रमाण कसे वाढतात हे उदाहरणांच्या माध्यमातून सांगितले. तेजस्विनी फाउंडेशनच्या संस्थापिका जीविता पाटील यांनी प्रत्येकाने आपले विचार शुद्ध ठेवले पाहिजे, विचार चांगले असतील तर घडणारे आचरण चांगले असेल आणि अर्थातच आचरण चांगले असले म्हणजे आपल्याकडून घडणारी कृती चांगली होते त्यामुळे आपोआपच गुन्हे कमी होतील. सुसंस्कारित पिढी घडणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. लायन्स क्लब ऑफ श्रीबाग अध्यक्षा लायन ड कला पाटील, सचिव लायन संदीप वारगे, खजिनदार लायन ॲड.अमित देशमुख यांचे सहकार्य लाभले. तसेच यावेळी डॉ.ॲड.निहा राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त यावेळी विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका मनीषा जाधव यांनी केले.

## मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग पनवेल शहर जिल्हा, दृष्टी फाऊंडेशन संस्था,एस. एन .आय केअर प्रा.लि,ओम पॅथॉलॉजी लॅबोरेटरी व आयुश हिलिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार २२ जुलै रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत एस.जी. डी पब्लिक स्कूल, प्लॉट नं.२८, सेक्टर-१०, खांदा कॉलनी, येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर आरोग्य तपासणी शिबीरात मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

तसेच मोफत औषधे देण्यात येतील. मोफत कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासुन चश्म्याचे नंबर काढुन देण्यात येईल. व अल्पदरात चश्मे देण्यात येतील. मोतीबिंदू किंवा इतर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास मोफत,अल्प दरात करण्यात येईल. मोफत मधुमेह (डायबेटीस) रक्त तपासणी करण्यात येईल. तसेच विना औषधी अँक्युप्रेशर चिकित्सेद्वारे गुडघेदुखी, कंबर दुखी, मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, मायग्रेन, सायट्रिका, स्पाँडिलायसिस, टेनिस एल्बो, फ्रोझन शोल्डर, हाडाचे विकार, सांधे विकार यावरील सर्व आजारावर अँक्युप्रेशर उपचार पद्धतीने मोफत उपचार करण्यात येतील.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : जुई, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींच्या ७/१२ उतारी सदरी श्री.कमलेश छोटालाल पारेख, यांचे नाव नमूद असून सदरच्या मिळकती त्यांच्या मालकी हक्कात व ताबेकब्जात असल्यामुळे सदरहू मिळकती ह्या आमचे अशिलांनी विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत, तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता आमचे अशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जुई, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| जुई | १०७/१ | ००-२९-६० पो.ख. ००-०२-३० | ०.५९ |
| जुई | १०७/२ | ००-४४-०० पो.ख. ००-०३-५० | ०.८९ |
| जुई | १०७/३ | ००-४८-०० पो.ख. ००-०४-१० | ०.९९ |
| जुई | १०७/४ | ००-४२-०० पो.ख. ००-०३-५० | ०.८४ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सदर मिळकतींमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी, कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहू मिळकती निर्वेध व बोजाविरहित असून, त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२१/०७/२०२२

**सही/-**
**ॲड.सागर एस. जगे**
**गाळा नं.८, श्री लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसा, टिळक रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९००४०८८३५३**

# स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाप्रसंगी हुतात्म्यांना मानवंदना देणे हीच खरी राष्ट्रभक्ती ठरेल

**दै.रायगड नगरी । उरण**

येत्या १५ ऑगस्ट २०२२ रोजी देशाच्या स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. या निमित्ताने भारत सरकारने हर घर तिरंगा हे अभियान राबविण्याचा मानस जाहीर केला आहे हे अभियान नव्या पिढीसाठी मार्गदर्शन करणारे आहे. तर सामान्य जनतेला आपल्या राष्ट्राप्रती स्वाभिमान जागविणारे आहे. त्यामुळे राज्याचे नव निर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यानी राज्यात अझादि का अमृत महोत्सवया उपक्रमांतर्गत येत्या १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान हर घर तिरंगा अभियानराबविण्याचा संकल्प जाहीर केला आहे.



या अभियानासाठी राज्याच्या ग्रामविकास आणी नगरविकास विभागातर्फे जय्यततयारी सुरु आहे. मात्र केवळ हर घर तिरंगाफडकविण्याच्या नादात सरकारला स्वातंत्र्याच्या संग्रामात सहभाग घेऊन हौतात्म्य पत्करणाऱ्या देशभक्तांचा विसर पडलेला दिसतो. त्यामुळे ब्रिटीशांच्या बेच्छूट गोळीबारात चिरनेर जंगल सत्याग्रहात हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांचे यादिवशी स्मरण व्हावे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली समर्पित व्हावी आशी मागणी उरणच्या तमाम जनतेची आहे.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात चिरनेरचा जंगल सत्याग्रह हे एक देदीप्यमान पर्व आहे. ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधात स्वयंस्पुर्तीने घडलेला लढा आहे, याचे भान सरकरने राखणे गरजेचे आहे. ब्रिटीश सरकारला हादरा देण्यासाठी महात्मा गांधीजिनी केलेला मिठाचा सत्याग्रह असो, सविनय कायदेभंगाची चवळ आसो, अथवा चीरनेरचा जंगल सत्याग्रह असो या सर्वच सत्याग्रहाची नोंद भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरानि झालेली आहे.

चिरनेरच्या जंगल सत्याग्रहात आजू बाजूच्या गावांतील, परिसरांतील सुमारे पांच ते सात हजार लोकांनी भाग घेतला होता. त्या पैकी धाकू गवत्या फोफेरकर, धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी दोघेही - चिरनेर, रामा बामा कोळी - मोठी जुई, हसुराम बुधाजी घरत - खोपटे, रघुनाथ मोरेश्वर शिंदे(न्हावी) - कोप्रोली, परशुराम रामा पाटील - पाणदिवे, आनंद माया पाटील - धाकटी जुई, आलू बेमट्यां म्हात्रे - दिघोडे हे ब्रिटीशांच्या गोळीबारात बळी पडले तर ३८ ते ४० जण जखमी झाले हे सारे जण २० ते २२ वर्षाचे तरुण होते.

राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए.आर.अंतुले साहेब हे मुख्यमंत्री असतना ४ मार्च १९८१ रोजी चिरनेर येथे हुताम्यांना मानवंदना देण्यासाठी अलेत्यानंतर ९ ऑगस्ट रोजी १९८१रोजी क्रांतीदिनाचे औचित्य साधून माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर.अंतुले साहेबानी संपूर्ण महाराष्ट्रातील हुतात्म्यांची हुतात्मा स्मारक योजना राबविली पण आज हर घर तिरंगाअभियान राबविताना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतून साकारल्या जाणाऱ्या या महोत्सवाने जरी देशात राष्ट्रभक्तीची लाट उसळत असली तरी स्वातंत्र्याच्या लढयात सिंहाचावाटा असणाऱ्या आणि स्वातंत्र्य संग्रामात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचा विसर होता कमा नये तर त्यासाठी देशभरांतील तमाम हुतात्म्यांना मानवंदना देणे हीच खरी राष्ट्रभक्ती ठरेल.

## गोवे येथे कोलाड रोहा लायन्सक्लबच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोवे येथे लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा यांनी सामाजिक सेवेची जाण लक्षात घेऊन रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थी व पालक वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी गोवे शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना लायन्स क्लब कोलाड रोहा च्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकला वह्या, व पेन्सील बॉक्स, इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप गोवे शाळेत करण्यात आले. यावेळी क्लबचे सेक्रेटरी रविंद्र लोखंडे,खजिनदार डॉ श्यामभाऊ लोखंडे,उपाध्यक्ष डॉ. मंगेश सानप, लायन महेश तुपकर, विश्वास निकम, सामाजिक कार्यकर्ते विजय पवार,गोवे ग्रामपंचायत सदस्या रंजिता जाधव, अंगणवाडी सेविका सुजाता जाधव,दिनेश खराडे,पायल जाधव, संध्या जाधव, सुचिता शिर्के, अर्पिता जाधव,अस्मिता पवार,वैशाली आंबेकर, सुचिता मुसळे, मेघा जवके, प्राजक्ता पवार, जयश्री वाफिळकर,श्रुती सुर्वे, शारदा मुसळे,आदी पालकवर्गासह विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक जयेश महाडिक सर व उपशिक्षिका गांधारे मॅडम यांच्या उपस्थितीत लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा यांच्या सहकार्यातून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

**ॲड.सचिन बाबुराव कांबळे**
**अर्जदार तर्फे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१११९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०९/२०२२

१) श्रीमती.सिता अंबाजी कोळी
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्रीमती.कल्पना मयुर कोळी
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) कु.विशाल मयुर कोळी
वय : १७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
४) कु.निखिल मयुर कोळी
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
वरील १ ते ४ रा.मु.पो.तळोजा पाचनंद,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांचा मुलगा व अर्जदार नं.२ यांचे पती आणि अर्जदार नं.३ व ४ यांचे वडील स्व.मयुर अंबाजी कोळी, हे एम.जी.एम. हॉस्पिटल कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा :रायगड येथे दि.१२/०४/२०२२ रोजी मृत्यू पावले आहेत. स्व.मयुर अंबाजी कोळी, यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील वारसांची नोंद होणे आवश्यक आहे. सबब अर्जदार यांनी स्व.मयुर अंबाजी कोळी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : तळोजा पाचनंद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अ.नं. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | मौजे : तळोजा पाचनंद गाव, पनवेल महानगरपालिका क्षेत्र नवीन मालमत्ता घर क्रं.१०५७ (जुना मालमत्ता घर क्र.२०० ब/१) तळघर, तळमजला तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड | ५९८ चौ.फूट |

तरी अर्जदार यांच्या वारस हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर अर्जदार स्व.मयुर अंबाजी कोळी यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१ जुलै २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.सोनावणे साहेब
**ॲड.योगिता पाटील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०८९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२०२२

श्री.गणेश शंकरनारायण राव
वय : ७२ वर्षे, व्यव : निवृत्त
रा.सी-फ्लॅट नं.६०२, चंद्रीका, ९ रोड,
डायमंड गार्डन जवळ, चेंबुर, मुंबई-४०००७१ — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.अरविंद शंकरनारायण राव
वय : ७३ वर्षे, व्यव : निवृत्त
रा.बी-२५, प्रथम इनक्लेव्ह,
सनफार्मासमोर, वडोदरा, गुजरात-३९००१२
२) श्री.वसंत शंकरनारायण राव
वय : ७० वर्षे, व्यव : निवृत्त
रा.फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, बी ब्लॉक,
जनार्दन हाइटस, अंबालपाडी टेम्पल रोड,
उडपी, कर्नाटका-५७६१०३
३) श्री.रमेश शंकरनारायण राव
वय : ६९ वर्षे, व्यव : निवृत्त
रा.सी-१, ६०४, भिमा शंकर को.ऑ.सो.,
प्लॉट नं.१३, से-१९ ए, नेरुळ, ४०००७६
४) श्री.भास्कर शंकरनारायण राव
वय : ६५ वर्षे, व्यव : निवृत्त
रा.फ्लॅट नं.बी ००५, एस.एल.व्ही.,
ग्रीन्स बल्थुर मेन रोड, कडगोडी प्लान्टेशन,
बेंगलोर, कर्नाटका ५६००६७
५) श्री.चंद्रशंकर शंकरनारायण राव
वय : ६२ वर्षे, व्यव : निवृत्त
रा.देवनार टेलिकॉम फॅक्टरी, १८०२,
ऑगस्टस बिल्डींग, रहेजा ॲक्रोपोलिस II
देवनार, मुंबई ४०००८८ — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.सत्यवती शंकरनारायण राव ह्यांचा मृत्यू दि.३/९/२०२१ रोजी चेंबुर येथे झाला आहे. अर्जदार हे कै. सत्यवती शंकरनारायण राव यांचा मुलगा आहे. तसेच सामनेवाला क्रं.१ ते ५ हे कै.सत्यवती शंकरनारायण राव यांची मुले आहेत. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकत धारकाचे नाव मयत :**

**<u>SCHEDULE OF PROPERTY</u>**

**Description of property (i.e.) Flat of LATE SATHYAVATI SHANKARNARAYAN RAO :-**
**Apartment No.-704.**
**Celebration-KH4**
**Building No.15**
**7th Floor, Sect-16/17,**
**Kharghar, Navi Mumbai, PIN 410210**
**admeasuring area of 1031.190 SQF.**
**The purchase Value of the said Flat is Rs.35,57,606/-**
**(Rupees Thirty Five Lacs Fifty Seven Thousand Six Hundred Six Only)**
**50% Share of LATE SATHYAVATI SHANKARNARAYAN RAO**
**Rs.17,78,303/- (Rupees Fifty Seventeen Lacks Seventy Eight Thousand Three Hundred Three Only)**

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.सत्यवती शंकरनारायण राव यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून मा.कोर्ट अर्जदार यांस वारस प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## नांदगाव गुरुदत्त प्रासादिक भजन मंडळाचे भजनाचे सामने भाविक रसिक जनांचे आकर्षण

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील गुरुदत्त प्रासादिक भजन मंडळातर्फे विविध ठिकाणी आयोजित करण्यात येणारे भजनाचे सामने भाविक रसिक जनांचे आकर्षण ठरत आहेत.



आषाढी एकादशीचे औचित्य साधून नुकतेच रोहा तालुक्यातील चिल्हे गावामध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही चंद्रकांत लोखंडे यांच्या निवासस्थानी भाविक रसिक जनांनी भजन महर्षी कै.परशुराम पांचाळ (बुवा) व संतोष शिर्सेकर यांचे शिष्य व गुरुदत्त प्रासादीक भजन मंडळ (नांदगांव-खारीकवाडा) भजनीबुवा गोरख ग.कुमरोटकर यांचे सुश्राव्य बहारदार भजनाचा आनंद लुटला ! यावेळी त्यांचे शिष्य विलास भुरे (बुवा) महेंद्र भोईर (बुवा) तसेच कु.उदेश कासारे (बुवा) यांची उपस्थिती होती. त्यांना पखवाज साथ सागर राऊत यांनी दिली आणि कु. शुभम मोरे, कु. सुरज कुमरोटकर आतिष वालवटकर, कु.प्रितम कुमरोटकर, भालचंद्र शेडगे, आर्यन भणगे,अमर कुमरोटकर सौरभ शेळके यांनी कोरस मध्ये साथ दिली तर सुरेश भणगे यांनी चकवा साथ दिली. यावेळी भजनी बुवा गोरख कुमरोटकर यांचा चंद्रकांत लोखंडे यांनी शाल व श्रीफल देऊन सत्कार केला.या कार्यक्रमाला परीसरातील भाविक रसिक उपस्थित होते.

**ॲड.निलीमा नि. नात्ती**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०९०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/०९/२०२२

कै.स्वदेश रंजन घोष (मयत) यांचे वारस
कै.मंजुश्री स्वदेश घोष (मयत पत्नी) यांचे वारस
१) श्री.गौतम स्वदेश घोष (मुलगा-१)
वय : ६२ वर्षे, धंदा : व्यवसाय
(पॅन/आधार क्र.AIPPG6444H/४५८६ ६२१५ ६३६२)
रा.राधा स्वामी बंगलो, प्लॉट क्र.१०, रोड क्र.३,
सिडको गार्डन जवळ, सेक्टर-११,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) श्री.उत्तम स्वदेश घोष (मुलगा-२)
वय : ५९ वर्षे, धंदा :
(पॅन/आधार क्र.ABNPG9738P/५२२६ ४५९५ ६७५८)
रा.फ्लॅट नं.डी-२०१, निलतेज सोसायटी,
प्लॉट क्र.२८, से.१६, पिल्लाई कॉलेज जवळ,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
३) श्री.अनुपम स्वदेश घोष (मुलगा-३)
वय : ५६ वर्षे, धंदा :
(पॅन/आधार क्र.AAFPG1697J/९६०८ २३४७ ६९४५)
रा.३८/१०५, रिवर वुड पार्क, कल्याण, शिळ रोड,
खिडकाळी, कल्याण, ठाणे, पडळे, महाराष्ट्र-४२१२०४
४) श्री.बिमल स्वदेश घोष (मुलगा-४)
वय : ५३ वर्षे, धंदा :
(पॅन/आधार क्र.AJMPG9484H/९११८ ८०४७ ९०९८)
रा.राधा स्वामी बंगलो, प्लॉट क्र.१०, रोड क्र.३,
सिडको गार्डन जवळ, सेक्टर-११,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
५) श्री.पुरुषोत्तम स्वदेश घोष (मुलगा-५)
वय : ५१ वर्षे, धंदा :
(पॅन/आधार क्र.ABLPG7067M/७७२१ १४७० ७९७४)
रा.फ्लॅट क्र.१०४, इमारत क्र.३, बी-२,
स्वागत कॉम्प्लेक्स, सुकापूर, जरी मरी आई मंदिराजवळ,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
६) श्रीमती.प्रिती राहासा साहु
पुर्वाश्रमीची प्रिती स्वदेश घोष (विवाहित मुलगी-१)
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
(पॅन/आधार क्र.ECVPS6966L/८६६६ ९४५७ ७६४२)
रा.पसायदान बिल्डींग, पहिला मजला, थेऊर रोड,
पाटील वस्ती, केसनंद, पुणे-४१२२०७
वरील सर्व क्र.१ ते ६ अर्जदार — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.स्वदेश रंजन घोष यांचे १४ ऑक्टोबर १९९६ रोजी तेरणा हॉस्पिटल, ता.पनवेल, जि.रायगड येथे आजाराने मृत झाले आहेत व त्यांची पत्नी कै.मंजुश्री स्वदेश घोष या दि.२१ फेब्रुवारी २००८ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे आजाराने मृत झालेले असून त्यांना अर्जदार क्र.१ ते ६ हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना कै.स्वदेश रंजन घोष व कै.मंजुश्री स्वदेश घोष यांच्या नावे खालील वर्णनाच्या स्थावर मिळकती आहेत.

सबब खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार क्र.१ ते ६ यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

**परिशिष्ट क्र. ''अ''**
**मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अनु. क्र. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | राधा स्वामी बंगलो, प्लॉट क्र.१०, रोड क्र.३, सिडको गार्डन जवळ, सेक्टर-११, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ | १२० चौ.मी. (चटई क्षेत्र) |

कै.स्वदेश रंजन घोष व कै.मंजुश्री स्वदेश घोष यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार क्र.१ ते ६ हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. अर्जदार क्र.१ ते ६ हे सदरचा वास दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. तरी अर्जदार क्र.१ ते ६ यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्ती हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या मे.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार क्र.१ ते ६ हे कै.स्वदेश रंजन घोष व कै.मंजुश्री स्वदेश घोष यांच्या वारसपत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१/०७/२०२२ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## नवीन पनवेलमध्ये २४ जुलैला ध्यानसाधना कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री धुतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित इन्स्टिटयूट ऑफ योग अँन्ड आयुर्वेद व आरोग्य सेवा समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने ध्यानसाधना कार्यशाळेचे आयोजन रविवार दि. २४ जूलै २०२२ रोजी सकाळी ७ वाजता नविन पनवेल येथील के.आ. बांठिया विद्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी नवी मुंबईचे योगशिक्षक व निसर्गोपचार तज्ञ तथा योगविद्या निकेतन मुंबईचे उपपिठाधिकारी दुर्गादास सावंत उपस्थित राहणार असून ते उपस्थितांना योगासंबंधी बहूमूल्य मार्गदर्शन करणार आहेत. सदर कार्यशाळा विनाशुल्क असून येणाऱ्या नागरिकांना मोफत प्रवेश दिला जाणार आहे, तरी तमाम नागरिकांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून सदर उपक्रम यशस्वी करावे, असे आवाहन आरोग्य सेवा समितीच्या कार्यक्रम प्रमुख गीता गुप्ता यांनी केले आहे. यावेळी आरोग्य सेवा समितीचे अध्यक्ष मधुसूदन जोशी, उपाध्यक्ष सुरेश जाधव, योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके उपस्थित होते.

## लोन करून देतो असे सांगून फसवणूक करणाऱ्या आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोन मंजूर करून देतो असे सांगून नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला तळोजा पोलिसांनी अटक केली आहेत. अमित कुमार यादव (रा. डोंबिवली) असे आरोपीचे नाव आहे.

फसवणूक प्रकरणातील आरोपी अमित यादव यास पोलिसांनी अटक केलेली आहे. सदर आरोपी हा सामान्य लोकांकडून त्यांना लोन करून देतो असे सांगून त्यांच्याकडून कमिशन म्हणून पैसे उकळतो. परंतु कोणतेही लोन करून देत नाही. अशा प्रकारे आरोपीने मागील चार महिन्यात वीस ते पंचवीस लोकांकडून आठ लाख रुपये इतकी रक्कम घेऊन फसवणूक केलेली होती. या आरोपीस डोंबिवली येथून अटक करण्यात आलेली आहे. ईतर कोणाचीही या इसमाने फसवणूक केली असल्यास तळोजा पोलीस ठाण्याचे सपोनी सुनील गुरव यांच्याशी संपर्क करावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# दरडप्रवण गावांमध्ये शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केली टेहळणी

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांची अभिनव संकल्पना..टेहळणी दिन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



सध्याच्या मान्सून कालावधीमध्ये रायगड जिल्ह्याच्या दरडप्रवण भागांमध्ये नैसर्गिक आपत्तींच्या घटना घडल्यास तात्काळ मदत पोहोचविणे, स्थलांतरीत करण्यात आलेल्या निवारा केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे तसेच मागील काही दिवसांमध्ये अतिवृष्टीमुळे दरडप्रवण गावांमध्ये दरड कोसळण्याची लक्षणे आढळतात किंवा कसे याची टेहळणी करण्यासाठी तसेच तेथील नागरिकांशी संपर्क साधून अतिवृष्टीच्या वेळी सतर्क राहणे व त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी दि.१६ जुलै २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून टेहळणी दिन ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली.

त्यानुषंगाने उपवनसंरक्षक– रोहा, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी– माणगाव, श्रीवर्धन, रोहा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, तहसिलदार– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, निवासी नायब तहसिलदार– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, गटविकास अधिकारी– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत– महाड, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपविभागीय अभियंता– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपअभियंता– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, परिक्षेत्र वन अधिकारी– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, तालुका कृषी अधिकारी– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपअभियंता, पाणीपुरवठा– महाड पोलादपूर, श्रीवर्धन म्हसळा, माणगाव, तळा, रोहा या जिल्हास्तरीय तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांनी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्याशी समन्वय साधला. यासाठी त्यांना रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसिलदार सुरेश काशिद, तहसिलदार दिप्ती देसाई, महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, महसूल व पोलीस व नगरपरिषद प्रशासनातील स्थानिक अधिकारी–कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

दरडप्रवण गावांमध्ये प्रत्यक्ष भेट देणे, तेथील नागरिकांशी संपर्क व संवाद साधणे, नागरिकांच्या सुरक्षिततेची तसेच अन्य गोष्टींची काळजी घेण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव त्यांच्या सोबत असल्याचा नागरिकांना विश्वास देणे, दरडप्रवण गावांच्या परिसराच्या टेहळणी दरम्यान आढळलेल्या विशेष बाबींचे निरीक्षण करून त्या बाबी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे, अशा विविध जबाबदाऱ्या या सर्व अधिकाऱ्यांना नेमून दिल्या होत्या. या अधिकाऱ्यांनी तेथील ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांना दरडीची पूर्व लक्षणे, घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करून अतिवृष्टीच्या काळात सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले. त्यांना जिल्हा प्रशासनाने जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी केलेल्या तयारीची, उपलब्ध साहित्य सामुग्रीविषयीची माहिती दिली. तसेच त्यांच्याशी चर्चा करीत, त्यांच्या समस्या जाणून घेत त्यावर उपाययोजना करण्याबाबतची कार्यवाही देखील तात्काळ सुरु केली. या टेहळणी दिनानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी पोलादपूर तालुक्यातील मौजे कुडपण, भोगाव (येलंगेवाडी) आणि कोंढवी या दरडप्रवण गावांना भेट देऊन पाहणी केली. तसेच त्यांनी मौजे तळीये येथे भेट देऊन दरडग्रस्त गावाचे पुनर्वसन होत असलेल्या कामाची पाहणी करून तेथील ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या.

## वाढत्या महागाईमुळे महिला वर्गाची जीवघेणी कसरत पुन्हा सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सातत्याने होत असलेलीच वाढती महागाई यातच केंद्र शासनाने नुकताच खाद्य पदार्थांसह इतर अनेक वस्तूंवर जिएसटी मध्ये वाढ केल्याने महिला वर्गाचे स्वयंपाकघरातील बजेटच कोलमडून गेले आहे व त्यांची स्वयंपाकघरातील जीवघेणी कसरत पुन्हा सुरु झाली आहे.

सीएनजीपासून पेट्रोल–डिझेलच्या भाववाढीचा उडालेला भडका, वीजबिल वाढीचा शॉक, घरगुती गॅस सिलिंडरची दर महिन्याला होणारी वाढ, तेलाचे वधारलेले दर यामुळे भडकलेल्या महागाईच्या आगडोंबात सर्वसामान्य माणूस होरपळून निघत आहे. त्यातच केंद्र सरकारने सोमवारपासून खाद्यपदार्थांसह इतरही अनेक वस्तूंवरील जीएसटीमध्ये वाढ केली आहे. यामुळे स्वयंपाकघरातून गृहिणींच्या बजेट कोलमडून पडले आहे. किराणा माल विक्रेत्यापासून हातगाडीवर वडापाव विकणाऱ्याला देखील जीएसटीचा फटका बसला आहे. वाढत्या महागाईमुळे ग्राहक ही जेवढे जीवनावश्यक वस्तू आहे. त्यापलीकडे खरेदी करत नसल्यामुळे नफा देखील घटला आहे. त्यामुळे दुकान कसे चालवायचे असा प्रश्न दुकानदारांना पडला आहे. भाजी पाल्यामध्ये होत असलेली दररोजची दर वाढ, चिकन, मटण, अंडी, मासे यांचे दर सुद्धा चढे होत चालले आहेत.

दुग्धजन्य पदार्थसुद्धा महाग होत चालले असून, वेगवेगळ्या डाळी, मसाले, तांदूळ व फळे आदींचे दर सुद्धा वाढत चालले आहेत. लवकरच श्रावण महिना सुरु होत असल्याने याकाळात सुद्धा पाले भाज्या व गोडधोड मोठ्या प्रमाणात घरोघरी केले जाते त्यातच वेगवेगळे सण या निमित्ताने येत असल्याने स्वयंपाक घराचे बजेट सुद्धा वाढलेले असते. त्यामुळे स्वयंपाक घर चालवणाऱ्या माता भगिनींना हि ताळमेळ कशी साधायची हा मोठा प्रश्न पडला आहे.

## मुसळधार पावसात मृगगड किल्ल्यावर दुर्गवीर प्रतिष्ठानची संवर्धन व स्वच्छता मोहीम फत्ते

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील भेलीव गावाजवळील छोटेखानी पण मोक्याच्या ठिकाणी असलेला इतिहासातील महत्त्वपूर्ण असा मृगगड हा किल्ला आहे. या किल्ल्यावर नुकतीच मुसळधार पावसात दुर्गवीर प्रतिष्ठान तर्फे संवर्धन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

दुर्गवीर मार्फत गेली ८ वर्ष मृगगडावर सातत्याने संवर्धन व श्रमदान मोहीम राबण्यात येत आहेत. या वेळच्या मोहिमेत गडावरील पाण्याचे मुख्य बांधीव टाक्यातील दगड व माती चैनपुली च्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. तसेच त्यांचे वर्गीकरण करुन सुव्यवस्थित ठेवण्यात आले आहेत. उर्वरित टाके पुढील मोहिमेत मोकळे केले जाईल. हे टाकं पूर्णतः दगड, माती व गाळ यातून मोकळे झाले तर यामध्ये पिण्याचे पाणी टिकून राहील व मृगगडावरील उन्हाळ्यातील पाण्याचा प्रश्न सुटेल असा अंदाज दुर्गवीरांचा आहे. या मोहिमेत मुंबई, नवी मुंबई, कल्याण व भिवंडी येथील एकूण २२ दुर्गवीरांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये एकनाथ अस्वले, मंगेश पडवळे, भूषण पाटील, रुपाली अवघडे, विशाल इंगळे, अमित शिंदे, प्रतिक पाटेकर, मंदार गावकर, नयन पोटे, प्रतीक इंदुलकर, अजित करके, सौरभ भागल, रोशन कदम, करण गुळवी, किशोर सावरकर, चेतन रावल, मनोज तरडे, ओम जगताप, प्रतीक भोनकार, रुपेश दळवी, श्रीहरी पवार, सीमा पाटील, योगेश पाटील यांचा समावेश आहे.



## रंगीबेरंगी राख्यांनी फुलू लागली बाजारपेठ ; महागाईमुळे खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी कमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

येत्या ११ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन हा बहीण भावाच्या अतूट नात्याचा सण साजरा होणार आहे. त्यासाठी रंगीबेरंगी राख्या बाजारपेठेत फुलू लागल्या असल्यातरी यंदाच्या महागाईमुळे महागड्या राख्या खरेदीचा कल कमी दिसून येत असल्याने राखी विक्रते सुद्धा चिंतेत आहेत.



नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन निमित्त ग्राहक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेमध्ये जाऊन रंगीबेरंगी अत्याधुनिक राख्या खरेदी करत असतात. त्यामूळेच रंगीबेरंगी राख्यांची सध्या बाजारात रेलचेल दिसून येत आहे. शंभर रुपये डझनपासून एक हजाराहून अधिक किमतीच्या राख्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मात्र, गतवर्षी दहा रुपयांना मिळणारी राखी यंदा पंधरा रुपयांना विकली जात आहे. किमतीत दरवाढ झाल्याने महिला वर्गाकडून नाराजी व्यक्त होत आहे. दोन वर्षांपूर्वी कोरोनामुळे अनेकांना रक्षाबंधनास मुकावे लागले होते.

लॉकडाऊनमध्ये राख्या बनवण्याचे काम हातातून गेल्यानंतर कारागिरांनी उदरनिर्वाहासाठी दुसऱ्या ठिकाणी काम सुरू केले आहे. त्यामुळे आता राख्या बनवण्यासाठी कारागिरही उपलब्ध होत नसल्यामुळे जादा पैसे देऊन कारागिरी करून घ्यावी लागते. त्यातच आता कच्च्या मालाच्याही देखील किमतींमध्ये वाढ झाली असून वाहतुकीचाही खर्च वाढला आहे. त्यामुळे राखीच्या दरात वाढ झाली असल्याचे व्यावसायिक सांगत आहेत परंतु राख्या खरेदीकरण्यासाठी महिला वर्गाची गर्दी सुद्धा कमी प्रमाणात दिसून येत आहेत अनेक जण पारंपरिक राख्या खरेदीवर भर देत आहेत तर

काही जण ऑनलाईन राख्या खरेदी करणे पसंत करत आहेत. शेवटच्या २ ते ३ दिवसांत राख्यांची विक्री वाढेल असा विश्वास राखी विक्रेत्यांकडून व्यक्त होत आहे.

## खांब नाक्यावर रहदारीचे ठिकाणी रस्त्यावर मोठा खड्डा



**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खांब नाक्यावरील रस्त्यावर रहदारीचे ठिकाणी पडलेल्या भरल्या मोठ्या खड्ड्यामुळे येथील अपघातचा धोका वाढला आहे.

मुंबई–गोवा महामार्ग, पाऊस आणि पावसाळ्यातील खड्डे यांचे वर्षानुवर्षे जवळचे ऋणानुबंध आहेत. कारण जरासा जरी पाऊस पडला तरी पुर्ण महामार्ग हा खड्डेमय होऊन जातो. या गत वर्षीच्या तुलनेत या वर्षी पावसाळा हा जुलैमध्ये सुरू झाला आहे. तब्बल एक महिना उशिराने पावसाळा चालू झाला तरी महामार्गाची अशी अवस्था निर्माण झाली. तर जूनमध्येच पाऊस पडला असता तर याबाबत कल्पनाच न केलेली बरी. महामार्गावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे अपघातास कारणीभूत ठरत असताना प्रशासन देखील मुग गिळून बसले आहे. खांब नाक्यावर देखील मुख्य रहदारीचे ठिकाणी पडलेल्या भल्या मोठ्या खड्ड्यामुळे अपघातचा धोका संभवत आहे. कारण मुख्य रहदारीचे ठिकाणची वाहने व पादचारी नागरिक यांची सततची असणारी रहदारी व येथील खड्ड्याचा नवख्या वाहन चालकांना अंदाज येत नसल्याने त्यांनाही समस्येला सामोरे जावे लागत आहे.

येथील महामार्गावरील रहदारीचे मार्गावर पडलेल्या खड्ड्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली असल्याने येथील अपघाताचा धोकाही अधिक वाढत चालला असल्याने संबंधित यंत्रणेने या गंभीर समस्येबाबत लवकरच उपाययोजना करण्याची मागणी प्रवासी वर्गाकडून केली जाऊ लागली आहे

## बँक राष्ट्रीयकरण दिन साजरा, बँक राष्ट्रीयकरण सर्व सामान्यांच्या हिताचेच

**दै.रायगड नगरी । पनवेल**



बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन (ए.आय.बी.ई.ए.) मुंबई व सी.के.टी. महाविद्यालय, नवीन पनवेलच्या अर्थशात्र विभागातर्फे बँक राष्ट्रीयकरण दिन नुकताच थाटात साजरा करण्यात आला. याप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबईचे संघटन सचिव, अरविंद मोरे, अर्थशात्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. बाळासाहेब पाटील व प्रा. काकासाहेब ढवळे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते अरविंद मोरे यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण झाले तेव्हा पासून देशाची आर्थिक प्रगती होऊन आपला देश कसा समृद्ध झाला हे सांगितले. ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीयकृत बँकांनी मोठ्या उद्योगापासून तर छोट्या उद्योगधंद्यांना कर्ज देऊन सर्वांना समृद्ध करून त्यांना मुख्य प्रवाहात आणले. राष्ट्रीयकृत बँकांनी जी कामगिरी प्राथमिक क्षेत्रात केली आहे ती उल्लेखनीय आहे. राष्ट्रीयकृत बँकांमुळे बँकांचा विस्तार होऊन बँक समाजाच्या सर्व स्तरा पर्यन्त पोहचून बँकिंग सुविधांचा सर्वांना लाभ मिळाला आहे. ह्या सर्व राष्ट्रीयकृत बँक तंत्रज्ञानाने समृद्ध असून त्या कालानुरूप बदलून व स्वतःला सक्षम करून अद्यावत व तत्पर सेवा देत आहेत. ह्या राष्ट्रीयकृत बँकांमुळे लाखो तरुणांना रोजगार सुद्धा मिळाला आहे.

अरविंद मोरे पुढे म्हणाले की, आता ह्या बँक राष्ट्रीयीकरण्याच्या विरुद्ध दिशेने वारे वाहत आहेत. बँकांचे खासगीकरण होऊ पहाते आहे. जर बँकांचे खासगीकरण झाले तर त्यामुळे सर्व सामान्यांना बँकिंग सुविधेपासून वंचित राहावे लागेल. त्यांनी सर्वाना आवाहन केले की, बँकिंग हा सर्वांचा मूलभूत हक्क आहे व ह्या हक्कासाठी सर्वानी लढले पाहिजे. बँकिंग सुविधा ही सर्वाना मोफत मिळाली पाहिजे कारण की हा सामान्य जनतेचा अधिकार आहे. याप्रसंगी विद्यार्थ्यांची ५३ शिष्यवृत्तीची खाती सुद्धा उघडण्यात आली. याप्रसंगी प्रा.डॉ. बाळासाहेब पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेत बँक राष्ट्रीयकरणामुळे देशाचा कसा विकास झाला हे सांगितले तसेच १९९१ नंतर भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण स्विकारल्या नंतर बँकिंगचा चेहरा मोहराच बदलला हे सांगितले. ह्या प्रसंगी अर्थशात्राचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिते,जोहे येथील ३४३ विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य व शाळे करीता ई लर्निंग किट व डिक्शनरीचे वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

ग्रामीण भागातील विद्यर्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी लाईट ऑफ लाईफ हि संस्था मोलाचे कार्य करत आहे. संस्थेच्या संस्थापिका डॉ. विली डॉक्टर यांनी २००२ रोजी या संस्थेची स्थापन केली आणि आजपर्यत १५ हजार विद्यार्थांना शैक्षणिक प्रवाहत आणले आहे. या योगदानाला अनुसरून नुकतेच पेण तालुक्यातील बाळगंगा विद्यामंदिर चुनाभट्टी जिते व न्यू इंग्लिश स्कूल जोहे या शाळांमधील आठवी ते दहावीच्या एकूण ३४३ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला २०० पानी वह्या आलेख वही व कंपास पेटी देण्यात आली व तंत्रज्ञानाचा वापर करुन नवनवीन पद्धती शिकण्यासाठी शाळे करीता ई लर्निंग किट तसेच इंग्लिश विषयाचे ज्ञान वाढण्यासाठी प्रतेक इयत्ते करीता तीन डिक्शनरी संच देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावे म्हणून लाईट ऑफ लाईफ या संस्थेचा नेहमी आग्रही प्रयत्न असतो. तळागाळातील विद्यार्थी शैक्षणिक साहित्या अभावी शाळाबाह्य न होता तो शाळेत जावून शिकता पाहिजे हा संस्थेचा उद्देश असल्याने त्यासाठी या संस्थेचे कार्यकर्ते नेहमीच ग्रामीण भागात कार्यरत असतात.

या संस्थेच्या जिल्हा समन्वयक सारिका राऊत यांच्या मार्गदर्शनाने संस्थेचे कार्यकर्ते मोलाचे योगदान देत आहेत. एच डी एफ सी बँक परिवर्तन विभागाने या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले आहे. याप्रसंगी लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती कांचन थोरवे, जिल्हा समन्वयक श्रीमती सारिका राउत. श्री सुशील घरत. जिते गावच्या उपसरपंच, शिक्षक पालक संघाचे अधिकारी दोन्ही शाळांचे मुख्यध्यापक शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या संस्थापिका यांचे विद्यार्थ्यांनी व पालकांनी आभार व्यक्त केले आहेत.